**राज्य शासनाच्या विविध कार्यालयांकडे त्यांच्या कार्यालयीन वापरासाठीची सर्व वाहने तसेच शासकीय / कार्यालयीन वाहन अनुज्ञेय असलेल्या पदाधिका-यांना वाहने खरेदी करताना अनावश्यक खर्च टाळण्यासंबंधी सूचना ....**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः- वाहन-२०२६/प्र.क्र.२८ /विनियम**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक: ११ ऑगस्ट, २०२६.**

वाचा : -

१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वाहन-१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.०९.२००१.
२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वाहन-२०१३/प्र.क्र.४६/१३/विनियम, दि.०३.१०.२०१७.
३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:डीएफपी-१०२०/प्र.क्र.१९/२०२०/विनियम, दि.१०.०९.२०२०
४) शासन निर्णय , वित्त विभाग, क्रमांक वाहन-२०२४/प्र.क्र.११/विनियम, दि. ०२.०२.२०२४.
५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:वाहन २०२५/प्र.क्र.१९/विनियम, दि.१७.०९.२०२५

**प्रस्तावना:**

शासकीय कार्यालयांकरिता वाहने खरेदी करताना वाहनांच्या विशिष्ट नंबरसाठी (आर.टी.ओ. -स्पेशल नंबर) मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. शासकीय वाहनांसाठी विशिष्ट नंबर घेण्याबाबत शासनाचे कोणतेही आदेश नसल्यामुळे त्यासंबंधी सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यासंदर्भात शासकीय कार्यालयांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे:-

**परिपत्रक**

संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये शासकीय व इतर कार्यालयांमध्ये वाहनांच्या वापरांसंबंधीचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. शासकीय कार्यालयांच्या पदाधिका-यांकरिता राज्य वाहन आढावा समितीच्या मान्यतेने वाहन अनुज्ञेयता निश्चित करुन त्यांच्या दर्जानुसार शासकीय वाहने उपलब्ध करुन देण्यात येतात.

०२. वाहनांच्या खर्चात झालेली वाढ, चलनफुगवटा, वाहनांमधील तांत्रिक बदल व अद्ययावत वैशिष्टये यामुळे संदर्भ क्रमांक ५ येथे नमूद शासन निर्णयान्वये वाहनांची किंमत मर्यादा सुधारित करण्यात आली आहे.त्यामध्ये वस्तू व सेवा कर, मोटार वाहन कर व नोंदणी शुल्काचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.

०३. शासकीय कार्यालये , शासनाचे सार्वजनिक उपक्रम तसेच शासन अनुदानित आस्थापना / संस्था यामध्ये वाहनांचा वापर होतो. सदर वाहनांवर दुरुस्ती देखभाल, इंधन , वाहनचालकांचे वेतन इत्यादी मोठया प्रमाणावर खर्च होत असतो. राज्याच्या विविध शासकीय कार्यालयांची कर्तव्ये गतिमानतेने पार पाडण्यासाठी राज्य शासनाने पदाधिका-यांना / अधिका-यांना वाहने उपलब्ध करुन दिली आहेत. यास्तव एकूण खर्चात काटकसर करण्याच्या धोरणाला अनुसरुन व वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने आवश्यक तेथे गरजेपुरतेच वाहनांसंबंधी खर्च करणे अपेक्षित आहे. यास्तव वाहनांच्या विशिष्ट नंबरसाठी (आर.टी.ओ. -स्पेशल नंबर) पदाधिका-याने/ कार्यालयाने खर्च केल्यास त्या खर्चास कोणत्याही परिस्थितीत निधी मंजूर केला जाणार नाही, याची नोंद सर्व शासकीय कार्यालयांनी घ्यावी.

०४.     वरील सूचना सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग आणि त्यांच्या अधिनस्त सर्व यंत्रणा/ ग्रामीण/नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ विद्यापीठे/ शैक्षणिक संस्था/ वैधानिक मंडळे/स्वायत्त संस्था/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/ मंडळे/ महामंडळे यांना लागू राहतील.

सदर परिपत्रक सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या तात्काळ निर्दशनास आणावे.

०५.     उपरोक्त शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेताक २०२६०८११११२५४०९९३०५ असा आहे. प्रस्तुत परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.08.11 12:55:08 +05'30'

**(रविकुमार लिंगनवाड)**
**शासनाचे उप सचिव**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. सर्व सन्माननीय विधान परिषद, विधानसभा व संसद सदस्य.
७. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग,
९. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा / अपील शाखा), मुंबई,
१०.प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई,
११.महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१४.प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१५.प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१६.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१९.प्रमुख न्यायाधिश, कुटुंब न्यायालय,पुणे/नागपूर/औरंगाबाद/अकोला/अमरावती/ठाणे/नाशिक/ सोलापूर / मुंबई,
२०.विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२१.सर्व विभागीय आयुक्त,
२२.सर्व जिल्हाधिकारी,
२३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२४.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२५.सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे /नागपूर/ औरंगाबाद/ नाशिक/ अमरावती,

२६.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२७.संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,
२८. सर्व कोषागार अधिकारी
२९.मंत्रालयाच्या सर्व प्रशासनिक विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख आणि कार्यालय प्रमुख,
३०.वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३१.निवड नस्ती, विनियम, वित्त विभाग.

********